| CNR No.**MHKO200000942021** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | – | २३ | ०२ | २०२१ |
| | नोंदणी तारीख | – | २३ | ०२ | २०२१ |
| | निकाल तारीख | – | ०२ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस. |
| | | | ०५ | ०२ | ०९ |

<u>**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर**</u>
<u>**यांचे न्यायालयात( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**</u>

**नियमित फौजदारी खटला क्रमांक १३/२०२१.**
**न्यायनिर्णय निशाणी क्रमांक ७८/ ब.**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक– ०२ मे २०२६**

शाहुवाडी पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं.५३८/२०२० भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत शाहुवाडी पोलीस ठाणे,<br>ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्रीमती व्ही. डी. माने |
| आरोपी | १. | तुकाराम ऊर्फ बाळु शिवाजी जाधव, व.व.५१, |
| | २. | संतोष तुकाराम उर्फ बाळु जाधव, व.व.२८, |
| | ३. | प्रसाद प्रकाश पानारी, व.व.२९, |
| | ४. | प्रदिप तानाजी जाधव, व.व.२४, |
| | | सर्व रा.कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर |
| | ५. | राजाराम रंगराव वाळवेकर, व.व. ३६, |
| | ६. | विकास आप्पा वाळवेकर, व.व. २९, |
| | | दोघे रा. तळेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर |
| आरोपी क्र.१ ते ४ तर्फे विधीज्ञ | | ॲड. श्री. के. बी. देसाई. |
| आरोपी क्रं.५ व ६ तर्फे विधीज्ञ | | ॲड. श्रीमती जे. बी. पाटील. |

## <u>भाग–ब</u>
## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०५.१२.२०२० |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०६.१२.२०२० |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २३.०२.२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | २०.०९.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | ०३.०४.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

## आरोपीची माहिती

<table>
<tr><th>आरोपी क्रं.</th><th>आरोपीचे नांव</th><th>अटक दिनांक</th><th>जामिनावर सोडल्याचा दिनांक</th><th>गुन्हयाचे कलम</th><th>अंतिम आदेश</th><th>शिक्षा</th><th>फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी</th></tr>
<tr><td>१.</td><td>तुकाराम ऊर्फ बाळु शिवाजी जाधव, व.व.५३,</td><td rowspan="5">०७.१२.२०२०</td><td rowspan="5">०८.१२.२०२०</td><td rowspan="5">भा.दं.सं. कलम १४३, १४७, ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे</td><td>निर्दोष मुक्तता</td><td>–</td><td>–</td></tr>
<tr><td>२.</td><td>संतोष तुकाराम उर्फ बाळु जाधव, व.व.२८,</td><td>निर्दोष मुक्तता</td><td>–</td><td>–</td></tr>
<tr><td>३.</td><td>प्रसाद प्रकाश पानारी, व.व.३१,</td><td>निर्दोष मुक्तता</td><td>–</td><td>–</td></tr>
<tr><td>४.</td><td>प्रदिप तानाजी जाधव, व.व.२४,</td><td>निर्दोष मुक्तता</td><td>–</td><td>–</td></tr>
<tr><td>५.</td><td>राजाराम</td><td>निर्दोष</td><td>–</td><td>–</td></tr>
</table>

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रंगराव वाळवेकर, व.व. ३८, | | | | मुक्तता | | |
| ६. | विकास आप्पा वाळवेकर, व.व. ३०, | | | | निर्दोष मुक्तता | – | – |

**भाग–क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | मुलबा श्रीपती कारंडे | फिर्यादी | २८ |
| २. | आकारा लक्ष्मण पाटील | घटनास्थळ पंच | ६० |
| ३. | आनंदा धोंडीराम तिरुके | साक्षीदार | ६५ |
| ४. | राजाराम बापू पाटील | साक्षीदार | ६६ |
| ५. | शांताराम कृष्णा पाटील | साक्षीदार | ६७ |
| ६. | मधुकर कृष्णा पोवार | तपासी अंमलदार | ६८ |

**ब–बचावपक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २९ | फिर्याद |

| | | |
|---|---|---|
| २. | ३० | छापील प्रथम खबर |
| ३. | ३१ | दि.०८/१२/२०२० रोजीचा फिर्यादीचा पुरवणी जबाब |
| ४. | ६१ | घटनास्थळ पंचनामा |
| ५. | ६९ | तपासाचा लेखी आदेश |
| ६. | ७० | जप्ती पंचनामा |

## ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

## क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | १६ | दोषारोप |
| ३. | १७ ते २२ | आरोपींचे निवेदन |
| ४. | ७२ ते ७७ | आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन |

## ड. भौतिक वस्तु

| **अ.क्रं.** | **मुद्देमाल अर्टीकल नं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | -- | एक होंडा कंपनीची लिवो मोटर सायकल नं. एम.एच.-०९-एफ.डी.६२९६ तिचा चेसिस नंबर ME4JC718JT050116 व इंजिन नं. JC71ET319206 असा असलेली ग्रे रंगाची २०१९ मॉडेलची |
| २. | -- | एक हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटर सायकल नं.एम.एच.-०८डी.-६२९६ तिचा चेसिस नंबर 98L19F00651 व इंजि नंबर 98L17E00306 असा असलेली लाल रंगाची १९९८ मॉडेलची |
| ३. | -- | एक हिरो कंपनीची स्प्लेंडर प्रो मोटर सायकल नं.एम.एच.-०९-सी.एफ.-३९२३ तिचा चेसिस नंबर MBLHA10ANCJA705 89 तिचा इंजि नंबर HA10EGCHA 06804 असा असलेली काळे रंगाची 2012 मॉडेलची |

# न्या य नि र्ण य
## (दिनांक २ मे २०२६ रोजी घोषित)

आरोपी यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,३४१,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केल्याची चौकशी झालेली आहे.

**०२.** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी मरळे गावातील संजय गोविंद डाकवे यांचे ट्रॅक्टरवर त्यांचे गावातील मुकादम आनंदा धोंडिराम तिरुके यांचे ऊस टोळीत ऊस तोड कामगार म्हणुन काम करत आहे. त्या टोळीमध्ये गेले चार वर्षापासुन ते कामाला आहेत. चालु वर्षी गेले एक महिन्यापासुन ऊस तोडणी काम चालु आहे. फिर्यादीचा चुलत भाऊ मकाजी गणपती कारंडे यांची मुलगी रेश्मा व बाळु शिवाजी जाधव रा. कळे यांचा मुलगा यांचे लग्न करण्याचे ठरले होते परंतु भाऊ मकाजी यांनी मुलगीचे वय कमी असलेने लग्न नंतर ठरवु असे सांगितले होते. त्या कारणावरुन बाळु जाधव हे मुलीचे लग्न कधी करणार आहेस असे म्हणुन दमदाटी करत होते. त्याबाबत मकाजी कारंडे यांनी शाहुवाडी पोलीस ठाणेत तक्रार दिली होती व त्या कारणावरुन तो मकाजी याचेवर चिडुन होता. दि.०५/१२/२०२० रोजी नेहमीप्रमाणे सकाळी ०६.०० वाजताचे सुमारास फिर्यादी यांचे टोळीतील सर्व लोक ऊस तोड करणेरीता ट्रक मालक संजय गोविंद डाकवे याचे सावर्डी येथील कोंडमळा नावचे शेतात गेले होते. दिसभर ऊस तोडणीचे काम करुन ते सायंकाळी ०६.०० वाजाताचे सुमारास मालकाचे ट्रॅक्टरमध्ये ऊसाचे तोडलेले वाडे भरुन फिर्यादी तसेच त्याचा चुलत भाऊ मकाजी गणपती कारंडे, आनंदा नाना तुरुके,मारुती धोंडीराम तुरुके, राजाराम बापु पाटील, शांताराम कृष्णा पाटील, मारुती कृष्णा पाटील, आनंदा नाना कांबळे, आनंदा सावबा पाटील, विठोबा लक्ष्मण कारंडे, दगडू रानोजी पाटील, पांडुरंग कानु पाटील, विनाथ शिवाजी पाटील, ज्ञानदेव बाळु शेलार असे सावर्डी येथुन ट्रॅक्टरमधुन इंजोली गावी जात असताना सावर्डी गावचे हद्दीत कोंडमळा येथे आले

असता बाळु उर्फ तुकाराम शिवाजी जाधव, संतोष बाळु उर्फ तुकाराम जाधव, असे दोघे त्यांचे जवळ असले टु व्हीलर व इतर चौघेजण राजाराम रंगराव वाळवेकर, विकास आप्पा वाळवेकर, प्रसाद प्रकाश पानारी व प्रदिप तानाजी जाधव दोन टु व्हीलर गाडीवरुन येवुन त्यांचे टॅक्टरच्या आडवी लावुन ट्रॅक्टर थांबवुन फिर्यादीचा भाऊ मकाजी यास ट्रॅक्टरमधुन खाली उतर असे म्हणाले नंतर भाऊ मकाजी हा खाली उतरले नंतर बाळु शिवाजी जाधव याने त्याचे कानाखाली हाताने मारुन पायावर लाथा मारल्या. त्यानंतर फिर्यादीचा भाऊ मकाजी जमीनीवर खाली पडला त्यावेळी फिर्यादी व पांडुरंग कानु पाटील असे फिर्यादीचा भाऊ मकाजी व बाळु शिवाजी जाधव यांचे भांडण सोडवणेकरिता गेले असता फिर्यादी व पांडुरंग या दोघांना लाथाबुक्कयांनी मारहाण केली. तसेच आरोपींच्या सोबत असलेल्या चार इसमांनी त्यांना ''तुझ्या आईला झवतो'' अशी शिवीगाळ करुन तुला सोडणार नाही अशी धमकी दिली असुन सदर भांडणामध्ये फिर्यादीच्या गळयातील सोन्याची चेन कोठेतरी पडली आहे. त्यानंतर ते पोलीस ठाणेत तक्रार देणेसाठी आल्यानंतर पोलीसांनी फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ मकाजी, पांडूरंग कानु पाटील यांना दवाखाना यादी देवुन उपचाराकरिता ग्रामीण रुग्लणालय मलकापुर येथे पाठवले. सदर दवाखान्यामध्ये औषधोपचार करुन पोलीस ठाणेत तक्रार दिली आहे.

**०३.** फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपींविरुध्द शाहुवाडी पोलीस ठाणे गु.र.क्र.५३८/२०२० भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद झाला. सदर गुन्हयाचा तपास तपासी अंमलदार सहा.फौजदार एम. के. पवार यांनी केला असुन त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवली, जप्ती पंचनामा केला, जखमींची वैदयकीय प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे प्राप्त करुन कामात सामील केली व केलेल्या तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे.

**०४.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.१६ नुसार भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,३४१,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवला. आरोपींना दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविल्याने तसे त्यांचे निवेदन नि.क्र.१७ ते २२ वर नोंदविण्यात आले.

**०५.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता एकुण सहा साक्षीदारांचा साक्षीपुरावा नोंदवला असुन अभियोगपक्षाने काही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी विनंतीवरुन तसेच पुरेशी संधी दिलेनंतर नि.क्र.१ कडील दि.०६/०३/२०२६ रोजीचे आदेशाने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदवणेत आले असता त्यांनी कोणताही गुन्हा केला नसल्याचे कथन केले आहे, परंतु त्यांनी त्यांचे बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत–

| अ.क्र. | <u>प्रश्नबिंदू</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, दि.०५/१२/२०२० रोजी सायंकाळी ०६.०० वाजताचे सुमारास कोंडमळा, सावर्डी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर येथे आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा की ज्याचा सामाईक उद्वेश फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करणेचा उद्वेश असलेल्या जमावाचा घटक होते व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम १४३ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हल्ला करुन मारहाण केली व बलप्रयोग किंवा हिंसाचार करुन दंगल केली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम १४७ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ३. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपी क्र.१ तुकाराम ऊर्फ बाळु याने साक्षीदार मकाजी यांना हाताने कानाखाली तसेच लाथानीं मारहाण करुन तसेच आरोपी क्रं.३ तुकाराम ऊर्फ बाळु यांनी फिर्यादी मुलबा व साक्षीदार पांडूरंग यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ४. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी साक्षीदार मकाजी यांची बेकायदेशीररित्या अडवणुक केली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३४१ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ५. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपी यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना "तुझ्या आईला झवतो" यशा शब्दात शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रक्षोभीत केले व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | संहिता कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | |
| ६. | अभियोगपक्ष हे शाबीत करतात का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी फिर्यादी व साक्षीदार यांना ''तुला सोडणार नाही'' असे म्हणुन जिवे मारणेची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी |
| ७. | आदेश काय ? | आरोपी यांची निर्दोषमुक्तता करणेत येते |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>प्रश्नबिंदू क्र.१ ते ६ करीताः</u>**

**०७.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ६ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०८.** प्रस्तुत प्रकरणातील आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने त्यांचा मुख्य साक्षीदार क्र.१ मुलबा श्रीपती कारंडे **(फिर्यादी/नि.क्र.२८)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की,ते शेती काम करतात. त्यांच्या भावाचे नाव मकाजी कारंडे आहे. मकाजीला दोन मुली नामे रेश्मा व सुषमा व वैभव नावाचा मुलगा आहे. रेश्माचे लग्न संतोष जाधव यांच्याशी ठरले होते.

रेशमाचे वय लग्नासाठी कमी असलेने संतोषचे वडील बाळू यांनी मुलगी वयात आल्यानंतर लग्न करू असे सांगितले. त्यावर बाळू जाधव यांनी लग्न आत्ताच करा अशी दमदाटी केली. त्यांच्या भावांनी वर नमूद गोष्टींबाबत त्यांच्या विरूध्द तक्रार दाखल केली. सदर तक्रारीमुळे तुमच्या मनात त्यांच्याविषियी राग आहे. सन २०२० च्या डिसेंबर महिन्यामध्ये ते उस तोडणीच्या कामासाठी संजय डाकवे यांच्या कोंडमळा गाव सावर्डे येथे होते. त्यांच्यासोबत अजून १३ मजूर गडी कामाला होते. दि.०५/१२/२०२० रोजी सकाळी ६ वाजता उस तोडणीच्या कामासाठी संजय यांच्या शेतात गेले होते. त्यादिवशी संध्याकाळी काम संपवून ६ वाजता डाकवे यांच्या उसाच्या ट्रॅक्टर मध्ये बसून उसाचे वाडे घेवून जात होते. त्यांच्या सोबत आनंदा तिरूके, मारूती तिरूके, जीवनाथ पाटील, शांताराम पाटील, मारूती पाटील, पांडूरंग पाटील, दगडू पाटील, ज्ञानदेव शेलार, राजाराम पाटील, मकाजी कारंडे असे होते. सावर्डे गावच्या रोडवर निम्म्या वाटेत असताना त्यांची दुचाकी तेथे आली. त्यांनी सदरचा ट्रॅक्टर अडविला. मकाजीला बाळू जाधव यांनी खाली ओढून घेतले व त्याला पाठीत, पायावर, कानाखाली मारायला सुरूवात केली. त्यांना सोडविण्यासाठी विठ्ठल कारंडे, पांडुरंग पाटील व सदर साक्षीदार खाली उतरले. विकास वाळवेकर, राजाराम वाळवेकर, संतोष जाधव, बाळू जाधव यांनी मिळून फिर्यादी व इतर लोकांना लाथा बुक्क्यांनी मारले. त्यांच्या गळयात सोन्याची चैन होती. झालेल्या झटापटीत ती गहाळ झाली. ती परत मिळून आली नाही. आरोपी बाळू जाधव यांनी तुझ्या आईचा असे म्हणून शिवीगाळ केली. त्यांनतर ते शाहूवाडी पोलीस स्टेशनला गेले. शाहूवाडी पोलीसांनी दवाखान्यात जाण्यास सांगितले. त्यावरून त्यांनी मलकापूर येथे ग्रामीण रुग्णालयात जाण्यास सांगितल्यावरून ते गेले व नि. २९ अन्वये त्यांनी तुमच्या विरूध्द फिर्याद दाखल केली. त्यांनी त्यांच्या साक्षीदरम्यान नि. ३० वरील प्रथम खबरी अहवाल शाबीत केला. फिर्याद दि. ०६/१२/२०२० च्या पहाटे ६ वाजता नोंदविलेली आहे. पोलीस तपासादरम्यान पंचनाम्यासाठी ते घटनास्थळी गेले होते.

घटनास्थळ त्यांनी पोलीसांना दाखवले.दि. ०८/१२/२०२० रोजी परत पुरवणी जबाब नोंदविण्यात आला. तो त्यांनी नि. ३१ अन्वये शाबीत केला.

**०९.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ आकाराम लक्ष्मण पाटील **(घटनास्थळ पंच/नि.क्र.६०)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, त्यांना शाहुवाडी पोलीसांनी सकाळी ८ वाजता कोंडमाळा या शेताजवळ बोलावले होते. दि. ०५/१२/२०२० रोजी फिर्यादी व आरोपी यांच्यात भांडण झाले होते. त्यासंदर्भात दि. ०६/१२/२०२० रोजी पोलीसांनी त्यांना चौकशीकरीता बोलावले होते. त्यांच्या सोबत बापू रामजी पाटील यांना देखील बोलावले होते. घटनास्थळ त्यांना फिर्यादींनी दाखवले. त्यांची पंचनाम्यावर अनुक्रमांक १ वर सही आहे. त्यातील मजकूर बरोबर असून तो नि. ६१ अन्वये त्यांनी शाबीत केला आहे.

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ आनंदा धोंडीराम तिरुके **(साक्षीदार /नि.क्र.६५),** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ राजाराम बापू पाटील **(साक्षीदार /नि.क्र.६६)** व अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं. ५ शांताराम कृष्णा पाटील **(साक्षीदार /नि.क्र.६७)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, उस तोडीतून आरोपी व त्यांची ओळख झाली होती. ते मुलबा श्रीपती कारंडे यांना ओळखतात. कारण ते त्यांच्या गावातील राहणारे आहेत. दि. ०५/१२/२०२० रोजी त्यांनी वाडयाची ट्रॉली कोंडमाळा या रावतांच्या मालकीच्या शेतात भरून घेवून जात होते. ते सायंकाळी ५ ते ५.३० च्या सुमारास चालले होते. सदरचा ट्रॅक्टर संजय डाकवे चालवत होता. त्यांच्यासहीत ट्रॅक्टरमध्ये १४ लोक होते. त्यावेळी आरोपी त्याठिकाणी आले व त्यांच्यात व फिर्यादी मध्ये वादावादी झाली. सदरची वादावादी कोणत्या कारणावरून झाली हे ते सांगू शकत नाहीत. फिर्यादी मकाजी कारंडे यांना आरोपींनी ट्रॉलीतून ओढले. याच्याव्यतिरिक्त त्यांच्यात व फिर्यादीमध्ये काय घडले याविषयी त्यांना माहित नाही. त्यांच्यात व फिर्यादी यांच्यात झोंबाझोंबी झाली होती. मुलबाने उपचार कुठे

घेतले होते हे त्यांना माहित नाही. आरोपी क्रं. १ ते ६ हे दुचाकी वाहनावरून आले होते.

**११.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.६ मधुकर कृष्णा पोवार **(तपासी अंमलदार/नि.क्र.६८)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि. ०६/१२/२०२० रोजी ते शाहूवाडी पोलीस स्टेशनला सहायक फौजदार म्हणून कार्यरत असताना गु.रं.नं. ५३८/२०२० चा तपास त्याचदिवशी त्यांच्याकडे आला. तपासाकामी त्यांना फिर्याद लेखी आदेश प्राप्त झाला होता. साक्षीदरम्यान त्यांनी लेखी आदेश नि. ६९ अन्वये शाबीत केला. फिर्याद फिर्यादी मुलबा कारंडे यांनी एकूण ६ आरोपींच्या विरूध्द भां.द.वि.क. ३४१,१४३,१४७,३२३,५०४,५०६ सह १४९ अन्वये दाखल केली होती. तपास त्यांच्याकडे आल्यानंतर फिर्यादीच्या मदतीने त्यांनी घटनास्थळांचा पंचनामा नोंदविला. घटनास्थळ हे इंजूरी ते करंजफेण जाणा–या रस्त्यावरील सावर्डे येथील कोंडमळा या शेतीच्या रोडवर आहे. त्यांनी तपासादरम्यान नि. ६१ वरील पंचनामा २ पंचानसमक्ष नोंदविला. साक्षीदारांची तपास टिप्पणे नोंदविली व प्रस्तुत कामात सामील केली. आरोपींनी गुन्हयाच्या कामी ३ मोटरसायकली वापरल्या होत्या. त्या त्यांनी जप्त करून घेतल्या होत्या. दि. ०३/१२/२०२० रोजी तीन मोटरसायकली जप्त केल्याचा पंचनामा दाखवला. तो त्यांनी नि. ७० अन्वये शाबीत केला. जखमींनी मलकापूर ग्रामीण रूग्णालयात उपचार घेतले होते. तेथून त्यांनी जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले होते. आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले व तपासाअंती आरोपींविरूध्द पुरावा आढळून आल्याने न्यायालयात दोषारोपत्रपाठवले.

**१२.** अशा प्रकारे उपरोक्त प्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा सरतपास पटलावर आला असताना सदर साक्षीदारांच्या एकूणच मौखिक पुराव्याचे मूल्यमापन करण्याकरीता त्यांचा सरतपास हा उलटतपासामध्ये देखील अबाधित राहिला आहे

काय हे पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे साक्षीदारांचा उलटतपास पुढीलप्रमाणे –

१३. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ मुलबा श्रीपती कारंडे **(फिर्यादी/नि.क्र.२८)** यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, आकाराम पाटील व बापू पाटील यांच्या घराण्याशी फिर्यादीचे घरोब्याचे संबंध आहेत. तसेच संजय डाकवे यांच्यासोबत त्यांचे चांगले संबंध आहेत. तथाकथित घटना दि.०५.१२.२०२० रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास घडली. हिवाळयात दिवस लहान असल्याने लवकर अंधार पडतो. घटनास्थळावरील रस्ता हा रहदारीचा असून घटनास्थळावर आसपास घरे नाहीत. आरोपीच्या ताब्यात कोणते दुचाकी वाहन होते हे त्यांना सांगता आले नाही. फिर्यादमध्ये इतर लोक असे फिर्याद देतेवेळी फिर्यादीने सांगितले आहे. सदर इतर लोक कोण यांची नावे त्यांना सांगता येणार नाहीत असे कथन केले आहे. त्यांनी पोलीसांना फिर्याद देतेवेळी दागिन्याचे वर्णन सांगितले होते. परंतु ते फिर्याद मध्ये पोलीसांनी का नमूद करून घेतले नाही याचे कारण फिर्यादीला सांगता आलेले नाही. उर्वरीत प्रश्नांना त्यांनी नाकबुल उत्तरे नोंदविली.

१४. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ आकाराम लक्ष्मण पाटील **(घटनास्थळ पंच/नि.क्र.६१)** यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, फिर्यादी मुलबा कारंडे हे त्यांचे पाहुणे आहेत. त्यामुळे त्यांचे फिर्यादीचे घरी जाणे येणे असते. फिर्यादी व बापू रामजी पाटील यांच्यातील संबंध चांगले आहेत. कारण बापू रामजी पाटील देखील करंजफेण, पाल येथील राहणारे आहेत. करंजफेण ही मोठी बाजारपेठ असून त्यांचे त्याठिकाणी कापड दुकान आहे. कोंडमाळा हे शेत कोणाच्या मालकीचे आहे हे त्यांना माहित नाही. आरोपी क्रं.५ ते ६ यांनी आरोपी क्रं.१ ते ४ तर्फे घेतलेला उलटतपास स्वीकृत केला.

१५. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ आनंदा धोंडीराम तिरूके **(साक्षीदार/नि.क्र.६५)** व साक्षीदार क्रं.४ राजाराम बापू पाटील

**(साक्षीदार/नि.क्र.६६)** व साक्षीदार क्रं.५ शांताराम कृष्णा पाटील **(साक्षीदार/नि.क्र.६७)** यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, ट्रॉलीतील वाडे फाळकाच्या वर दोन ते तीन फुट भरलेले होते. आरोपी क्रं.१ ते ६ हे ट्रॉलीत चढले नव्हते. सदर साक्षीदार हे फिर्यादीचे नातेवाईक असून ते फिर्यादीच्या सांगण्यावरून आरोपीविरूध्द साक्ष देत असल्याचे त्यांनी मान्य केले. सदर साक्षीदाराचा उलटतपास देखील आरोपी क्रं.५ व ६ यांनी आरोपी क्रं.१ ते ४ यांच्यातर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकृत केला.

**१६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.६ मधुकर कृष्णा पोवार **(तपासी अंमलदार/नि.क्र.६८)** यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, कोंडमाळा शेताशेजारी असणा–या इतर शेतकरी लोकांचे ७/१२ उतारे हस्तगत करुन त्यांनी प्रस्तुत कामात हस्तगत करून ते सामील केले नाहीत. संजय कांबळे व कृष्णात खुटाळे हे त्यांच्याकडे ब–याच कामात पंच म्हणून राहिलेले आहेत. कोंडमाळा याठिकाणी ते ज्या मोटरसायकलने गेले त्या मोटरसायकलचा नंबर त्यांना सांगता आलेला नाही. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपी क्रं.५ व ६ यांनी आरोपी क्रं.१ ते ४ यांच्यातर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकृत केला.

**१७.** एकंदरीत अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, साक्षीदार क्रं.१ मुलबा कारंडे फिर्यादी यांनी फिर्यादच्या अनुषंगाने उलटतपासात कोणतीही उत्तरे दिलेली नाहीत. तसेच फिर्याद सक्तरित्या शाबीत केलेली नाही. साक्षीदार क्रं.२ आकाराम पाटील यांनी कोंडमाळा शेत हे कोणाच्या मालकीचे आहे याविषयी माहिती नसल्याचे सांगितले, तसेच त्यांनी त्याविषयी माहिती करुन घेण्याचा प्रयत्न देखील केला नाही. केवळ फिर्यादी हे त्यांचे पाहुणे असल्याकारणाने त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यावर पोलीसांच्या सांगण्यावरून सही केली ही बाब स्पष्ट होते. साक्षीदार क्रं.३ आनंदा तिरुके, साक्षीदार क्रं.४ राजाराम

पाटील, साक्षीदार क्रं.५ शांताराम पाटील हे तिघेही उस तोडणी कामगार असून केवळ फिर्यादी मुलबा कारंडे यांच्या सांगण्यावरून साक्ष नोंदवली असल्याचे कबुल केले आहे. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं.६ तपासी अंमलदार मधुकर पोवार यांनी कोंडमाळा शेताशेजारी असणा–या इतर शेतकरी लोकांचे ७/१२ उतारे प्रस्तुत कामात हस्तगत करून ते प्रस्तुत सामील केले नाहीत. ते सामील करण्यास त्यांना कोणतीही अडचण नव्हती. परंतु ते सामील केलेले नाहीत. केवळ फिर्यादीच्या सांगण्यावरून घटनास्थळ पंचनामा नोंदवून साक्ष देत असल्याचे सरतपासात कथन केले. त्यांची साक्ष आरोपींविरुध्द गुन्हा सिध्दीकरिता पुरक ठरली नसल्याने केवळ पुराव्याअभावी आरोपींची प्रस्तुत गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करणेत येत आहे. सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **<u>प्रश्नबिंदू क्रं.१ ते ६ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.</u>**

**<u>प्रश्नबिंदू क्र.७ करीताः</u>**

**१८.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ६ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाचा आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,३२३,३४१,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ व विश्वासार्ह साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे सर्व आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. गुन्हया कामी जप्त तीन मोटर सायकली या आरोपींना न्यालयाच्या सुपुर्त नाम्याद्वारे परत देण्यात आलेल्या आहेत. सबब, प्रश्नबिंदू क्र.७ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र.१ तुकाराम उर्फ बाळू शिवाजी जाधव, आरोपी क्रं.२ संतोष तुकाराम ऊर्फ बाळु जाधव, आरोपी क्रं.३ प्रसाद प्रकाश पानारी, आरोपी क्रं.४. प्रदीप तानाजी जाधव, आरोपी क्रं.१ ते ४ रा. कळे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर, आरोपी क्रं.५ राजाराम रंगराव वाळवेकर, आरोपी क्रं.६ विकास आप्पा वाळवेकर दोघे रा. तळेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, ३२३, ३४१, ५०४, ५०६ सह कलम १४९

अन्वये शिक्षापात्र गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपींचे वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

३. जप्त मुद्देमाल तीन मोटर सायकली या आरोपींना न्यालयाच्या सुपुर्त नाम्याद्वारे परत देण्यात आलेल्या आहेत.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रक्कमेचा जामीन दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VAISHALI
Date: 2026.05.02 18:16:18 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

दिनांक –०२.०५.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे–खेरीवडे. कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.